# S.T.EDU.SOCIETY &CO-OP.EDU SOCIETY LTDS SHAHADA.
## AFFILITED TO S.N.D.T WOMENS UNIVERSITY,MUMBAI
## SR.ARTS MAHILA MAHAVIDYALAYA,SHAHADA
## TAL.SHAHADA, DIST.NANDURBAR PIN-425409

PROGRAMME PARTICIPANT LIST

SUBJECT- **Corona Vaccination Awareness camping.**

Date-27/10/2021

| Sr.No | Name Of Participant students | sign |
|---|---|---|
| 01 | Ku.Shweta Vinod Chaudhari | |
| 02 | Ku.Devyani Vivek vispute | |
| 03 | Ku.Puja bhanudas Patil | |
| 04 | Ku.Sejal Ajay chhajed | |
| 05 | Ku.Vaishali pralhad Patil | |
| 06 | Ku.dhanashree bhila Patil | |
| 07 | Ku.Nikita Sukhdev bheel | |
| 08 | Ku.Priyanka Sanjay Jagdale | |
| 09 | Ku. Dhanashree Ashok Marthe | |
| 10 | Asst.Prof.Khemraj D.Patil | |
| 11 | Asst.Prof Yogesh N.Bhusare | |
| 12 | Asst.Prof.Kakaso J.Anpat | |
| 13 | Asst.Prof.Santosh B.Tamkhane | |
| 14. | Dr. Kailas R. Chavhan | Chavhan |

SR. ARTS MAHILA MAHAVIDYALAYA, TAL. SHAHADA, DIST. NANDURBAR

Scanned by CamScanner

# S.T.EDU.SOCIETY &CO-OP.EDU SOCIETY LTDS SHAHADA.
## AFFILITED TO S.N.D.T WOMENS UNIVERSITY,MUMBAI
## SR.ARTS MAHILA MAHAVIDYALAYA,SHAHADA
## TAL.SHAHADA, DIST.NANDURBAR PIN-425409

PROGRAMME PARTICIPANT LIST

SUBJECT- **Corona Vaccination Awareness camping.**

**Date-29/10/2021**

| Sr.No | Name Of Participant students | sign |
|---|---|---|
| 01 | Ku.Shweta Vinod Chaudhari | [signature] |
| 02 | Ku.Devyani Vivek vispute | [signature] |
| 03 | Ku.Puja bhanudas Patil | [signature] |
| 04 | Ku.Sejal Ajay chhajed | [signature] |
| 05 | Ku.Vaishali pralhad Patil | [signature] |
| 06 | Ku.dhanashree bhila Patil | [signature] |
| 07 | Ku.Nikita Sukhdev bheel | [signature] |
| 08 | Ku.Priyanka Sanjay Jagdale | [signature] |
| 09 | Ku. Dhanashree Ashok Marthe | |
| 10 | Asst.Prof.Khemraj D.Patil | [signature] |
| 11 | Asst.Prof Yogesh N.Bhusare | [signature] |
| 12 | Asst.Prof.Kakaso J.Anpat | [signature] |
| 13 | Asst.Prof.Santosh B.Tamkhane | [signature] |
| 14. | Dr. Kailas R. Chavhan | [signature] |

SR.ARTS MAHILA MAHAVIDYALAYA, TAL.SHAHADA, DIST.NANDURBAR

Scanned by CamScanner

**S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S**

**S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,**

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## कोरोणा लसीकरण जनजागृती मोहीम

**दिनांक -27 ते 29 ऑक्टोबर 2021**






**कोरोणा लसीकरण जनजागृती करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी**





**कोरोणा लसीकरण जनजागृती करताना पथनाट्य सादर करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी**

Scanned by CamScanner

**S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S**

**S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,**

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## कोरोणा लसीकरण जनजागृती मोहीम

**दिनांक -27 ते 29 ऑक्टोबर 2021**





## कोरोणा लसीकरण जनजागृती करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी



शहादा : निशाणी युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिमेचा प्रारंभ करताना नगराध्यक्ष मोतीलाल पाटील. शेजारी डॉ. राजेंद्र वळवी, डॉ. मणिलाल शेल्टे, डॉ. शांताराम बडगुजर आदी.

### शहाद्यात मिशन युवा स्वास्थ्य लसीकरणास प्रारंभ

शहादा : येथील (कै.) डॉ. विश्रामकाका पाटील शैक्षणिक संकुलात कला, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये 'मिशन युवा स्वास्थ्य' लसीकरण मोहिमेचा प्रारंभ शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी अँन्ड को-ऑपरेटिव्ह एज्युकेशनल सोसायटी लिमिटेड संस्थेचे अध्यक्ष तथा शहादा पालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मोतीलाल पाटील यांच्या उपस्थितीत झाला. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र वळवी, डॉ.



लोकमत

### महाविद्यालयांमध्ये लसीकरण शिबिर

## मोहिमेची दखल घेताना सकाळ व लोकमत वृत्तपत्रे

Scanned by CamScanner

Date: 27/10/2021

# अहवाल

## मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम

स.ता.एज्यु. सो. & को -ऑफ एज्युकेशन सोसायटी लिमिटेड संचलित, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, सीनियर आर्ट्स महिला महाविद्यालय, आय. एम. आर .डी. महाविद्यालय मिशन युवा स्वास्थ या मोहिमेअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम आज दिनांक 27 ऑक्टोंबर ला राबविण्यात आली.

या कार्यक्रमास उपस्थित आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन नगराध्यक्ष वनश्री माननीय श्री तात्यासाहेब मोतीलाल पाटील तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र दळवी साहेब आणि माननीय श्री सोपान डाबेराव साहेब सी.वाय.डी.ए. ब्रांच मॅनेजर आणि डिस्ट्रिक्ट कॉर्डिनेटर माननीय श्री रवी पदमोर साहेब तसेच विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री. शांताराम बडगुजर सर व सीनियर आर्टस महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य कैलास चव्हाण सर आणि संचालक प्राध्यापक अनिल पाटील सर व तीनही महाविद्यालयाचे प्राध्यापक बंधू आणि भगिनी व एन एस एस स्वयंसेवक तसेच लसीकरणासाठी उपस्थित विद्यार्थी वर्ग आणि सर्व आरोग्य कर्मचारी व पत्रकार बंधु आजच्या मिशन युवा स्वास्थ या मोहिमेमध्ये सहभागी झाले होते

सी वाय.डी.ए आणि एन. एस. इ. यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन कोरोना विजय कवच हा प्रकल्प नंदुरबार जिल्ह्यात राबविण्यात येत आहे या मिशन कोरोना विजय कवच या मोहिमेअंतर्गत आपल्या महाविद्यालयांमध्ये लसीकरणाच्या उपक्रम 27 ऑक्टोंबर ते 28 ऑक्टोंबर हे दोन दिवस ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाविद्यालयात मिशन युवा स्वास्थ मोहीम अंतर्गत covid-19 लसीकरणाचा कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर महाविद्यालयाचा प्रांगणामध्ये उपस्थित मान्यवरांसमोर महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी लसीकरण जनजागृतीपर नृत्य सादर केले.यामध्ये सहभागी विद्यार्थीनी 1) श्वेता विनोद चौधरी 2) देवयानी विवेक विसपुते3) पूजा भानुदास पाटी सेजल अजय छाजेड 5) वैशाली प्रल्हाद पाटील 6) धनश्री भिला पाटील 7) निकिता सुखदेव भिल 8) प्रियंका संजय जगदाळे या विद्यार्थिनी नृत्यामध्ये सहभागी झाल्या होत्या.

प्राध्यापक खेमराज पाटील यांच्या मार्गदर्शनाने स्वयंसेवक विद्यार्थिनींनी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ प्रांगणामध्ये covid-19 लसीकरण जनजागृतीपर नृत्य सादर केले तसेच शहादा शहरातील सालदार नगर येथे या स्वयमसेवक विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले.

कोरोना या भीषण महामारी वर लक्ष केंद्रित करून आमचे एनएसएस स्वयंसेवक अंतर्गत खेडोपाडी पथनाट्य नृत्य गीत याद्वारे जनजागृती करीत असून आमच्या महाविद्यालयातील स्वयंसेवक विद्यार्थिनी लसीकरण केंद्रावरती कार्य करत आहे.

मिशन युवा स्वास्थ मोहीम अंतर्गत covid-19 लसीकरणाचा मेघा कॅम्प आयोजित केला या कार्यक्रमाच्या यशस्वी पूर्तीसाठी विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर बडगुजर सर तसेच आय

PRINCIPAL
S.T.Co-op.Edu.Society's
Arts College for Women
SHAHADA, Dist.Nandurbar

एम आर डी चे संचालक प्राध्यापक अनिल पाटील सर आणि सीनियर आठ महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.कैलास चव्हाण यांनी मार्गदर्शन केले तसेच वरील तीनही महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांचे प्रमुख तसेच तीनही महाविद्यालयाचे सहकारी प्राध्यापक यांनी मोलाची मदत केली

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्राध्यापिका मंगला चौधरी यांनी केले तसेच आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्राध्यापक खेमराज पाटील सर यांनी केले.

Scanned by CamScanner

अहवाल

दि.२८ व २९ /१०/२०२१

# covid-19 कोरोना, लसीकरण जनजागृती मोहीम

corono vaccination awareness campaign.

श.ता.एज्यू. अँड को- ऑप एज्यू.सोसायटी लि. संचलित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयातील एन.एस.एस. एककाकडून मिशन युवा स्वास्थ्य मोहिमे अंतर्गत लसीकरण जनजागृती मोहीम राबवण्यात आली.महाविद्यालयात लसीकरण कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीतच असे निदर्शनास आले की लसीकरण करण्यास मनात भीती निर्माण झालेली आहे, ती दूर व्हावी म्हणून एन.एस.एस. एककाने लसीकरण जनजागृती घडून यावी याकडे आपले लक्ष कैंद्रित केले. ही मोहीम दोन दिवस राबवून ज्या गावातील लसीकरण कमी झाले आहे, किव्वा त्या गावातील तरुण, वृद्ध स्री- पुरुष लसीकरण करत नाही अश्या गावांची सी. वाय. डी.ए. नंदुरबार या संस्थेनी माहिती दिली. व ही मोहीम आम्हास राबवण्यास मदत झाली.



प्रथम दिनांक २८ रोजी आम्ही सालदार नगर,लोणखेडा या ठिकाणी जावून जनजागृती व लसीकरणाचे महत्व नृत्य मधून सदर केले. या मोहिमेत महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवक १. श्वेता विनोद चौधरी २. देवयानी विवेक विसपुते ३. पूजा भानुदास पाटील ४. सेजल अजय छाजेड ५. वैशाली प्रल्हाद पाटील ६. धनश्री भिला पाटील ७. निकिता सुखदेव भिल ८. प्रियांका संजय जगदाळे ९.कल्याणी कोळी या विद्यार्थिनी व प्रा. योगेश भुसारे (N.S.S. कार्यक्रम अधिकारी ),प्रा. खेमराज पाटील (विदयार्थी विकास अधिकारी ) व सोबत CYDA ची टीम सहभागी झाले असून त्यांनी लसीकरण करा हो लसीकरण करा या गाण्यावर नृत्य सादर करून जनतेमध्ये जागृती घडवून आणली. दिनांक २९ रोजी आम्ही दत्तक गाव तीखोरा ,ब्राम्हणपुरी, जावादा या ठिकाणी जनजागृती केली. या दिवशीही वरील विद्यार्थिनी उपस्थित राहून त्यांनी समाजासाठी आपला वेळ दिला. या मोहिमेसाठी महाविद्यालयातील प्रा. खेमराज पाटील, प्रा.संतोष तमखाने, प्रा. काकासाहेब अनपट प्रा, मंगला पाटील, डॉ. कैलास चव्हाण व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

PRINCIPAL
S.T.Co-op.Edu.Society's
Arts College for Women
SHAHADA, Dist.Nandurbar

Scanned by CamScanner




व प्रा. रेणुका पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी हर्षदा धनलाल महाले, सूत्रसंचालन कुमारी दीक्षा संजीव कुवर यांनी केले तर आभार कुमारी कृपा सुनील चौधरी हिने केले.

**26/03/2022 शनिवार :- ग्राम स्वच्छता, बेटी बचाव व जल व्यवस्थापन पथनाट्य**

शहादा तालुका एज्युकेशन अँड को -ऑप एज्युकेशन सोसायटी लि. संचलित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर सुरू आहे. शहादा येथील श्रमिक नगर येथे आज स्वयंसेवक विद्यार्थिनींनी ग्राम स्वच्छता करून बेटी बचाव व जल व्यवस्थापन या विषयावर पथनाट्य सादरीकरण करून समाजात जनजागृती केली.




बौद्धिक सत्रात एन.एस.एस. स्वयंसेवक विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी प्रा. हेमांगी कुलकर्णी उपस्थित होत्या. यांनी "कौशल्य विकास" या विषयावर व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानात त्यांनी कौशल्य विकास हा आपल्या जीवनाशी संबंधित आहे कौशल्य म्हणजे नवनवीन कल्पना आत्मसात करणे आणि त्या कौशल्याचा व्यवस्थापनामध्ये उपयोग करून घेणे, त्याचे व्यवसायात रुपांतर करणे ही आजच्या काळाची गरज आहे. कौशल्यही कितीतरी प्रकारचे असतात, केंद्रीय स्तरापासून ते ग्रामीण स्तरापर्यंत कौशल्यातून विद्यार्थी विकास या अनुषंगाने विविध योजनांमार्फत नेहमीच कार्य केले जाते. विद्यार्थी हा देशाचा विकासाचा कणा आहे कौशल्यातून सर्वांगीण विकास साध्य करणे खूप महत्त्वाचा आहे असा संदेश त्यांनी दिला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु उर्मिला बागल, सूत्र संचालन कु. इशा निकुंभ यांनी केले तर आभार कु. जागृती वसई
-कुर हिने व्यक्त केले.



Scanned by CamScanner




श्रमिक नगर येथे स्वयंसेवक विद्यार्थिनींनी परिसरातील कुटूंबाचे सोसिअल इकॉनोमिक सर्वे केला.या मध्ये तेथील घरातील कुटुंब प्रमुख हे काय काम करतात, तसेच त्यांना रोजगार संधी कोणत्या आहेत व घरातील उत्पन्न किती आहे. तसेच त्यांना कोणत्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दयायला हव्या. अस्या पद्धतीने त्यांचा इकॉनॉमिक सर्वे करण्यात आला. त्यानंतर दुपार सत्रामध्ये बौद्धिक सत्र घेण्यात आले त्यात स्वयंसेवक विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी स्किल इंडिया तज्ञ शहादा येथील माननीय भूषण मराठे सर यांनी कौशल्य विकास आणि विद्यार्थिनींना स्वयंरोजगारासाठी भविष्यातील संधी कशा उपलब्ध होऊ शकतात यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सूत्रसंचालन कु; उर्मिला छोटू बागल हिने केले, प्रास्ताविक कु; ईशा सतीश निकुंभ हिने केले आणि कार्यक्रमाचे आभार कु; जागृती सुभाष वसईकर या विद्यार्थिनीने केले.



**29/03/2022 मंगळवार :- सक्षम बिटीया अभियान, तंत्रज्ञान युग व सांस्कृतिक कार्यक्रम**

शहादा तालुका एज्युकेशन अँड को -ऑप एज्युकेशन सोसायटी लि. संचलित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर सुरू आहे. राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचा आज सहावा दिवस या दिवसात श्रमिक नगर येथील वस्ती मधील दहा ते 19 वर्ष वयोगटातील ज्या मुली शिक्षणापासून वंचित आहे त्यांचे सर्वेक्षण केले. या कामाचा सदर अहवाल हा सक्षम बिटीया अभियान piramal foundation यांना सुपूर्द केले,व पुढील त्यांचे नियोजन या विद्यार्थीनीना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आहे. त्यानंतर दुपार सत्रामध्ये बौद्धिक सत्र घेण्यात आले. त्यात स्वयंसेवक विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे आई.क्यू.ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. उल्हास सोनवणे सर यांनी तंत्रज्ञान युगात रोजगार संधी याविषयी व्याख्यान दिले आजच्या एकविसाव्या शतकात आपण तंत्रज्ञानाचा वापर रोजगारासाठी खूप चांगल्या प्रमाणावर करू शकतो आणि स्वतःची आर्थिक प्रगती करू शकतो, यासंदर्भात स्वयंसेवक विद्यार्थिनींना प्रबोधन केले कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन कु; तारू पाडवी हिने केले,



Scanned by CamScanner

# अहवाल

01/12/2021

## जागतिक एडस् दिन

शहादा तालुका को. ऑप.एज्युकेशन सोसायटी संचालित व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक अंतर्गत दि. ०१/१२/२०२१ ऑक्टोबर २०२१ रोजी जागतिक एडस् दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख प्रमुख मार्गदर्शक वक्ते श्री जितेंद्र नायडे [ आय.सी.टी.सी.कौन्सिलर, ग्रामीण रुग्णालय शहादा. व त्यांचे सहकारी श्री अमोल सोनवणे [ आय.सी.टी.सी लॅब , टेक्निशियन ग्रामीण रुग्णालय शहादा.] हे उपस्थित होते. मा. जितेंद्र नायडे यांनी 'एडस: एक सामाजिक चिंतन' या विषयावर उपस्थित प्राध्यापक वर्ग व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात एडस् बाधित रुग्ण यांच्या विषयी समाजात सहानुभूती निर्माण करण्याची गरज आहे. तसेच हा आजार कसा होतो, आजार होऊ नये म्हणून आपण काय काळजी घेतली पाहिजे या विषयी सखोल माहिती दिली. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित प्रा. काकासाहेब अनपट [ धुळे, नंदुरबार जिल्हा एन.एस.एस. समन्वयक ] यांनी ही 'एडस् जनजागृती' बद्दल उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या जागतिक एडस् दिना निमित राष्ट्रीय सेवा योजना या एककातील विद्यार्थिनी कु. पूजा सुनील बोरसे, कु. ईशा सुदाम कदम, कु. योगेश्वरी योगराज अहिरे, कु. चेतना जीवन भोई कु. प्रतीक्षा संजय सामुद्रे एडस् या विषयावरती पोष्टर प्रदर्शन स्पर्धेत सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. कैलास चव्हाण यांनी केले. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची पृष्ठभूमी सांगितली. कार्याक्रमाचे सूत्रसंचालन एन.एस.एस. सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. मंगला पाटील यांनी केले तर उपस्थित मान्यवर अतिथी यांचे आभार एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश भुसारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन वनश्री तात्यासो. मोतीलाल पाटील, व्हा.चेअरमन मा.हिरालाल भाई पटेल, सचिव मा.ए.के. पटेल तर संस्थेचे संचालक दादासो.अभिजित एम.पाटील, महाविद्यालयीन विकास समिती सदस्या सौ.प्रीतीताई अभिजित पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. सोपान बोराटे, वरिष्ठ विज्ञान महाविद्यालायचे प्राचार्य मा.डॉ. शांताराम बडगुजर व संचालक मंडळ यांनी शुभेच्छा दिल्या.

SR. ARTS MAHILA MAHAVIDYALAYA, TAL. SHAHADA, DIST. NANDURBAR

PRINCIPAL
S.T.Co-op.Edu.Society's
Arts College for Women
SHAHADA, Dist.Nandurbar

Scanned by CamScanner

# एड्स सप्ताहनिमित्त जनजागृतीपर उपक्रम



शेजवा, ता.नंदुरबार येथील माध्यमिक विद्यालयात नाटीका सादर करताना शिक्षक.

लोकमत, 3/12/2021 शुक्रवार

**लोकमत न्यूज नेटवर्क**

नंदुरबार : एड्स सप्ताहनिमित्त जिल्हाभरात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. शाळा, संस्था व शासकीय कार्यालयांचाही यात सहभाग आहे.

**विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, शहादा**

शहादा येथील श.ता. एज्युकेशन अँड को-ऑप. एज्युकेशनल सोसायटी लि. संचालित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर विद्यार्थ्यांची एड्स चाचणी करून घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शांताराम बडगुजर होते. यावेळी ५० विद्यार्थ्यांची एड्स चाचणी करण्यात आली. कार्यक्रमात शहादा तालुका ग्रामीण रुग्णालय सल्लागार जितेंद्र नायडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली पाटील यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व रा.से.यो. एककाच्या स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

**के.डी. गावित विद्यालय, देवपूर**

नंदुरबार तालुक्यातील देवपूर येथील के.डी. गावित माध्यमिक विद्यालयात एचआयव्ही एड्ससंदर्भातील शंकांचे निरसन करण्यात आले. अध्यक्षस्थानी माधुरी साठे, तर प्रमुख पाहुणे संजय महाजन उपस्थित होते. माधुरी साठे यांनी विद्यार्थ्यांना एड्स होण्याची कारणे, कसा होतो, कसा पसरतो याविषयी मार्गदर्शन केले. सुनील पाटील यांनी सूत्रसंचालन केले. नूतन पाडवी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक मनोहर साळुंके, मीनाक्षी व्यास, हेमांगी पाटील, मनोजकुमार सूर्यवंशी, उदय पाटील, अतुल गावित, कन्हैयालाल पाटील, कन्हैयालाल धनगर, राकेश पाटील उपस्थित होते.



## शेजवा विद्यालयात नाटिकेद्वारे जनजागृती

नंदुरबार तालुक्यातील शेजवा येथील माध्यमिक विद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त पथनाट्य सादर करण्यात आले. मुख्याध्यापक डी. एस. पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी उपशिक्षक विजय पवार यांनी दिग्दर्शित केलेले 'वचन पाळूया एड्स टाळूया' हे पथनाट्य शिक्षकांनी सादर केले. यात कलाशिक्षक आनंदराव पवार, दीपक वळवी, रामानंद बागले, संजय बोरसे, हरुणखा शिकलीगर, अरुंधती शिंदे, नेहा शर्मा यांनीही सहभाग घेतला. पथनाट्यातून एचआयव्ही एड्स कसा होतो? त्याची लक्षणे कोणती? तो होऊ नये यासाठी काय काळजी घेतली पाहिजे? एचआयव्ही झालेल्या रुग्णाशी कशी वर्तणूक करावी? या सर्व विषयांवर प्रबोधन करण्यात आले. पथनाट्याचा शेवट एड्स विषाणूची प्रतीकात्मक तिरडी काढून करण्यात आला. कार्यक्रमासाठी संजय वसावे, दिनेश पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पाचवी ते दहावीचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन कलाशिक्षक आनंदराव पवार यांनी केले. आभार उपशिक्षक विजय पवार यांनी मानले.

**एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय, शहादा**

शहादा येथील तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचालित व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्नित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककअंतर्गत जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते जितेंद्र नायडे (आय.सी.टी.सी. कौन्सिलर, ग्रामीण रुग्णालय, शहादा) व त्यांचे सहकारी अमोल सोनवणे (आय.सी.टी.सी. लॅब, टेक्निशियन ग्रामीण रुग्णालय शहादा) हे उपस्थित होते. जितेंद्र नायडे यांनी 'एड्स : एक सामाजिक चिंतन' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी व्याख्यानात एड्सबाधित रुग्णांविषयी समाजात सहानुभूती निर्माण करण्याची गरज आहे. हा आजार कसा होतो, आजार होऊ नये म्हणून आपण काय काळजी घेतली पाहिजे याविषयी सखोल माहिती दिली. प्रमुख अतिथी प्रा. काकासाहेब अनपट (धुळे-नंदुरबार जिल्हा एन.एस.एस. समन्वयक) यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

जागतिक एड्स दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना या एककातील विद्यार्थिनी पूजा सुनील बोरसे, ईशा सुदाम कदम, योगेश्वरी योगराज अहिरे, चेतना जीवन भोई, प्रतीक्षा संजय सामुद्रे यांनी 'एड्स' विषयावर आधारित पोस्टर प्रदर्शनात सहभाग घेतला.

एन.एस.एस. सहा. कार्यक्रमाधिकारी प्रा. मंगला पाटील यांनी सूत्रसंचालन केले. एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश भुसारे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, व्हा.चेअरमन हिरालाल पटेल, सचिव ए.के. पटेल, संचालक अभिजित पाटील, महाविद्यालयीन विकास समिती सदस्या प्रीती पाटील, प्राचार्य डॉ. सोपान बोराटे, वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शांताराम बडगुजर व संचालक मंडळ उपस्थित होते.



शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त विद्यार्थ्यांची तपासणी करताना आरोग्य पथक. (छाया : ईश्वर पाटील)

## के.डी. गावीत विद्यालयात विविध स्पर्धा

नंदुरबार तालुक्यातील कोरीट येथील कृ. दा. गावीत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एड्स जनजागृती दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य मुकेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यानंतर पोस्टर स्पर्धा, घोषवाक्य व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक एस.व्ही. विसपुते तर अध्यक्षस्थानी विज्ञान शिक्षक एस.एन. पटेल होते. सूत्रसंचालन पी. एस. पाटील यांनी केले. याप्रसंगी पाचवी ते बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रश्नमंजूषा कार्यक्रमात सहभाग घेतला. स्पर्धांचे नियोजन एम.बी. पाटील यांनी केले तर पोस्टर स्पर्धेत कलाशिक्षक आर.पी. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी शिक्षकांनी एड्स संदर्भातील समज व गैरसमज याबाबतीत उद्बोधन केले. एस.व्ही. विसपुते यांनी एड्सचा आजार व लक्षणे संदर्भात समुपदेशन केले. अध्यक्ष एस.एन. पटेल यांनीही [illegible] पी.एस. पाटील, मीनाक्षी पाटील, एस.पी. ओगले, प्रा.बी.एम. चव्हाण, प्रा.अशोक पटेल, प्रा.सुनील खाडे, प्रा.नयना पवार, प्रा.स्वाती बारी, प्राथमिक शिक्षक एस.आर. पाटील, एस.ए. पाटील, जे.एस. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राजेंद्र राजपूत यांनी परिश्रम घेतले. आभार आर.पी. सोनवणे यांनी मानले.

Scanned by CamScanner

S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S

S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## एडस् दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा


दिनांक - 01/12/2021




पोस्टर निरीक्षण करताना डॉ. नायदे



सोबत प्राध्यापक वृंद




मार्गदर्शन करताना डॉ. नायदे सर

Scanned by CamScanner

# अहवाल

दि.०८/०३/२०२२

## जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयात "सक्षम बिटिया अभियान" बद्दल कार्यशाळा




शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी अँड कोऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी लिमिटेड चे सिनियर आर्ट्स महिला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना , जिल्हा प्रशासन नंदुरबार , पिरामल फाऊंडेशन, यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कॉलेज मध्ये 'सक्षम बिटिया अभियान- किशोरवयीन मुलींना शाळेत परत आणणे' या संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.सुरवातीला योगेश भुसारे (एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी) यांनी आजच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कैलास चव्हाण यांनी या अभियान व शिक्षणाचे महत्व विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पिरामल फाऊंडेशन चे रमेश जायनाकर (प्रोग्राम लीडर) यांनी या अभियान संबंधी विस्तारित माहिती सांगितली.या अभियानांतर्गत शाळाबाह्य , शाळेत नोंदणी केली नाही, शाळेत नाव नोंदणी आहे पण शाळेत जात नाही,पुढे शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे, नाव नोंदणी आहे पण शाळेत नियमित जाते,शाळेत नाव नोंदणी आहे पण शाळेत अनियमित असणाऱ्या किशोरवयीन मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे.या अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असणाऱ्या मुलींना वेगवेगळ्या शैक्षणिक योजनांची माहिती दिली जाणार आहे तसेच त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी समुपदेशन केले जाणार आहे या कार्यशाळेला डॉ. कैलास चव्हाण, काकासाहेब अनपट (एनएसएस समन्वयक धुळे नंदुरबार जिल्हा), एनएसएस स्वयंसेवक उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला पिरामल फाऊंडेशन चे प्रोग्राम मॅनेजर किशोर घरत, प्रा.मंगला पाटील, प्रा. देवचंद पाडवी, प्रा.संतोष तमखाने, सतीश पवार,आदित्य भोईर यांचे सुद्धा मोलाचे सहकार्य लाभले आहे





Scanned by CamScanner

डिजिटल शैक्षणिक दैनिक
रयतेचा कैवारी
संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक १५५ ) बुधवार दि.०९/०३/२०२२ पान ०३

# सक्षम बिटिया अभियानबद्दल कार्यशाळा संपन्न

नंदुरबार दि.८(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) जिल्हा प्रशासन नंदुरबार, पिरामल फाऊंडेशन, शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी अँड कोऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी लिमिटेडचे सिनियर आर्ट्स महिला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कॉलेज मध्ये 'सक्षम बिटिया अभियान- किशोरवयीन मुलींना शाळेत परत आणणे' या संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सुरवातीला योगेश भुसारे एनएसएस प्रोग्राम ऑफिसर यांनी आजच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. तसेच डॉ कैलास चव्हाण यांनी या अभियान व शिक्षणाचे महत्व विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पिरामल फाऊंडेशनचे प्रोग्राम लीडर रमेश जायनाकर यांनी या अभियान संबंधी विस्तारित माहिती सांगितली.



या अभियानांतर्गत शाळाबाह्य, शाळेत नोंदणी केली नाही, शाळेत नाव नोंदणी आहे पण शाळेत जात नाही, पुढे शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे, नाव नोंदणी आहे पण शाळेत नियमित जाते, शाळेत नाव नोंदणी आहे पण शाळेत अनियमित असणाऱ्या किशोरवयीन मुलीना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असणाऱ्या मुलीना वेगवेगळ्या शैक्षणिक योजनांची माहिती दिली जाणार आहे तसेच त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी समुपदेशन केले जाणार आहे.

या कार्यशाळेला डॉ. कैलास चव्हाण, पिरामल फाऊंडेशन चे प्रोग्राम लीडर रमेश जायनाकर, योगेश भुसारे,कॉलेजचे विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला पिरामल फाऊंडेशनचे प्रोग्राम मॅनेजर किशोर घरत, काकासाहेब आनपट एनएसएस समन्वयक धुळे नंदुरबार जिल्हा, प्रा.मंगला पाटील, प्रा.देवचंद पाडवी, प्रा.संतोष तमखाने, सतीश पवार,आदित्य भोईर यांचे सुद्धा मोलाचे सहकार्य लाभले आहे.

Scanned by CamScanner

S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S

S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## सक्षम बिटिया अभियान अंतर्गत सर्वेक्षण

दिनांक - 08/03/022





सक्षम बिटिया अभियान अंतर्गत सर्वेक्षण करताना
महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी







सक्षम बिटिया अभियान अंतर्गत सर्वेक्षण करताना
महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी

Scanned by CamScanner